स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
ईमेल : junnarforestdn@gmail.com
फोन नंबर 02132-222063

महाराष्ट्र शासन
वनविभाग

# उप वनसंरक्षक, जुन्नर वनविभाग, जुन्नर यांचे कार्यालय

दादोजी कोंडदेव वाडा, तहसिल कार्यालयाजवळ, जुन्नर जि. पुणे

क्रमांक- अ/कक्ष-4.2/ FCA - 52/ जमीन/206/2022-23, दिनांक 28 / 03 /2023

प्रति,
मुख्य वनसंरक्षक(प्रा.),
पुणे.

विषय : वन (संवर्धन) अधिनियम, 1980 अंतर्गत शिरूर नगर परिषद शिरुर यांना भूमिगत पिण्याच्या पाण्याच्या 3 पाईप लाईन टाकण्यासाठी मौजे शिरुर ता. शिरुर जि.पुणे येथील 0.270 हे. राखीव वनक्षेत्र वळती करण्याबाबत.

संदर्भ :
1. आपले कडील पत्र क्र. कक्ष-4/4(2)/जमीन/FCA- 351/660/ 2022- 23/ दि. 30/01/2023
2. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म.रा. नागपूर यांचेकडील पत्र क्र. कक्ष -17/नोडल/पुणे/आयडी-13079 (24)/2563 दि. 30/12/2022
3. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र. एफएलडी-2022/प्र.क.299/फ-1 दि.22/11/2022
4. मुख्य अधिकारी,शिरूर नगर परिषद, घोड नदी जिल्हा पूणे यांचेकडील पत्र क्रमांक 0887/2023 दिनांक- 23/03/2022.

उपरोक्त विषयांकित प्रकरणी मुख्य अधिकारी,शिरूर नगर परिषद, घोड नदी जिल्हा पूणे यांनी 0.27 हेक्टर वनक्षेत्र पाण्याच्या भूमीगत पाईपलाईनसाठी वळतीकरण करून मिळणेसाठी भारतीय वन (संवर्धन) अधिनियम, 1980 अंतर्गत प्रस्ताव सादर केला होता. सदर प्रस्तावावर अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म. रा. नागपूर यांनी संदर्भिय पत्रान्वये त्रुटी उपस्थित केल्या आहेत.

सदर त्रुटींची पूर्तता खालीलप्रमाणे करण्यात येत आहे.

| अ. क्र. | त्रुटी | पुर्तता |
|---|---|---|
| 1 | प्रकल्पासाठी प्रस्तावित वनक्षेत्र व पर्यायी वनीकरणाकरीता प्रस्तावित केलेल्या क्षेत्राची KML File सादर करावी. | केएमएल फाईल सीडी सोबत जोडण्यात आलेली आहे. |
| 2 | प्रस्तावित पाईपलाईन ज्या पाण्याच्या टाकीला जोडण्यात येणार आहे, ती टाकी वनक्षेत्रात असल्याचे नकाशावरुन दिसून येत आहे.सदर पाण्याची टाकीसाठी आवश्यक वनजमिनचा समावेश या प्रस्तावात केलेला नाही.तसेच, सदर टाकी बांधताना यापूर्वी वन (संवर्धन) | शिरुर नगरपरिषदेची नळ पाणी पुरवठा योजना महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळ मुंबई, परिसर अभियांत्रिकी विकास विभाग पुणे, यांचेकडून सन 1988 मध्ये कार्यान्वीत करण्यात आलेली आहे. (सोबत शिरुर शहर नळपाणी पुरवठा योजना हस्तांतरण टिप्पणी सादर केली आहे.) |



Scanned by TapScanner

| | | |
|---|---|---|
| | अधिनियम 1980 अंतर्गत परवानगी घेण्यात आली किंवा कसे याबाबत प्रस्तावात माहिती उपलब्ध नाही. | शिरुर नगरपरिषेदेच्या फिल्टेरेशन प्लॅन्ट व पाण्याच्या टाकीसाठी स.नं. 1140 पैकी मिळालेले क्षेत्र 1988 पुर्वी मिळाले असुन मा. जिल्हाधिकारी पुणे यांचे कडील आदेश क्र. / पम/ सीआर / 401 / 02/ दिनांक 03/10/2002 ची प्रत सोबत सादर करण्यात येत आहे.<br>तदनंतर स. नं. 1140 चे क्षेत्र हे महाराष्ट्र शासन राजपत्र क्रमांक REV - III - Forest - 48 / 1989 दिनांक 22 मार्च 1990 अन्वये भारतीस वन अधिनियम 1927 चे कलम 4 अंतर्गत अधिसुचित झालेले आहे. (सोबत अधिसुचनेची छायांकित प्रत जोडली आहे )<br>शिरुर नगरपरिषेदेच्या फिल्टरेशन प्लॅन्ट व पाण्याच्या टाकीसाठी नगरपरिषदेस वर्ग झालेले एकुण 0 हे. 90 आर क्षेत्र नगरपरिषदेच्या प्रत्यक्ष ताबा व वहीवाटीस आहे. सातबारा अभिलेखा नुसार एकुण 27.11 हेक्टर क्षेत्रापैकी 1. 00 हेक्टर क्षेत्र मुख्याधिकारी शिरुर नगरपरिषद शिरुर ( पाण्याची टाकी) व सरकार यांचे नावे असुन 26.11 हेक्टर क्षेत्र वनविभागाचे नावे असून पाण्याच्या टाकीचे वनक्षेत्रावर अतिक्रमण नाही. ( सोबत सातबारा अभिलेख प्रत ) |

प्रकरणी सदर पूर्तता अहवाल सोबत सादर केला आहे. तरी सदर अहवाल मान्यतेसाठी शासनास सादर होणेस विनंती आहे.

सोबत - वरीप्रमाणे

28.3.23

**(अमोल सातपुते)**
**उप वनसंरक्षक,**
**जुन्नर वनविभाग, जुन्नर**

O/c
PPD

**प्रत** - अप्रर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी म.रा. नागपूर यांना माहितीस्तव सविनय सादर.

**प्रत** - मुख्याधिकारी शिरुर नगरपरिषद घोडनदी, ता. शिरुर जि. पुणे यांना माहितीसाठी .

Scanned by TapScanner